जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:२८ सप्टेंबर, २०२२

---

जळगाव दि.२८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. बी. व्होक, बी.एस.डब्ल्यू या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वगळता इतर सर्व अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनलाईन संगणकीय प्रणालीव्दारे त्या त्या महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावर करण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. बी. व्होक, बी.एस.डब्ल्यू या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वगळता इतर सर्व अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनलाईन पध्दतीने ऑन स्क्रीन डिजीटल इव्हॅल्यूशन सिस्टीम या संगणकीय प्रणालीव्दारे त्या त्या महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावर करण्याचा निर्णय झाला. या निर्णयामुळे मूल्यांकनात अधिक पारदर्शीपणा येईल तसेच गुणपडताळणी व फेरमूल्यांकनासाठीचा लागणारा वेळ कमी होईल. तसेच उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स मागणी विद्यार्थ्यांने केल्यास त्याच्या मेलवर तातडीने उत्तरपत्रिका पाठविली जाईल. या शिवाय परीक्षांचे निकाल मुदतीच्या आधी लागण्यास मदत होईल. प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. बी. व्होक, बी.एस.डब्ल्यू या अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन त्या त्या महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रांवर केले जाणार आहे.

प्रथम वर्षाच्या सामान्यज्ञान विषयाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पध्दतीने घेण्यात येणारी परीक्षा व व्दितीय वर्षासाठीची पर्यावरण विषयाची परीक्षा आता परीक्षा केंद्रांवर आयोजित न करता ऑनलाईन पध्दतीने घेण्याचा निर्णय देखील या बैठकीत झाला.

विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिकांचे सेटींग व वितरण ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयांना केले जाणार आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका सेटींग व वितरणासाठी कालावधी कमी लागणार असला तरी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरल्याने खर्च वाढणार आहे. तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असल्यामुळे हा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला आहे. अशी माहिती प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल यांनी दिली.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२८ ( ) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग नवी दिल्ली व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात “स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी नायकांचे योगदान” या विषयावर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे संमेलन आयोजितक करण्यात आले आहे.

या एक दिवसीय विद्यार्थी संमेलनात “स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी नायकांचे योगदान” या विषयावर पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली असून प्रथम पूरस्कार रु.३३७५/-, व्दितीय रु.२२७५/- व तृतीय पुरस्कार रु.११७५/- देऊन गौरविण्यात येणार आहे. पोस्टर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी १x१ मीटर या आकाराचे फ्लेक्स बॅनर तयार करावयाचे आहे. महाविद्यालयाने पोस्टरची आपल्यास्तरावर छाननी करुन त्यातील निवडक किमान एक किंवा जास्तीत जास्त दोन पोस्टर संमलनात येतांना सोबत आणावी. पोस्टरची सॉफ्ट कॉपी ६ ऑक्टोबर पर्यंत sw@nmu.ac.in या ईमेलवर पाठवावी. या शिवाय संलग्नित महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील किमान दोन विद्यार्थ्यांना

संमेलनास पाठवावे असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.सुनील कुलकर्णी यांनी केले असून महाविद्यालयांना तसे पत्र पाठविण्यात आले आहे.

८ ऑक्टोबर रोजी या अनुसूचित जमाती विद्यार्थी संमेलनाचे उद्घाटन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांच्याहस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून बिरसा मुंडा जनजाती केंद्रीय विद्यापीठाचे (राजपिपला, गुजरात) कुलगुरु प्रा.मधुकर पाडवी हे उपस्थित राहणार आहेत. जनजाती आयोगाचे संयोजक वैभव सुरंगे, आर.एस.मिश्रा, प्रकाश टारपे हे संमेलनात मार्गदर्शन करणार आहेत. उद्घाटनाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी राहतील. हे संमेलन यशस्वी करण्याचे आवाहन प्रा.सुनील कुलकर्णी, संमेलन शैक्षणिक प्रमुख प्रा.अमरदीप पाटील व प्रा.भूषण चौधरी यांनी केले आहे.

**बातमी क्र.३**

जळगाव दि.२८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्यावतीने पदवीधरांसाठी भाषा कौशल्ये या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेचे डॉ.राम चव्हाण, भौतिकशास्त्र प्रशाळेचे डॉ.जसपाल बंगे व प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. प्रोजेक्ट जेनेसिस, इन्फोसिस बी पी एम पुणे अंतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली.

**बातमी क्र. ४**

जळगाव दि.२८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून विन्ले पॉलिमर लिमिटेड, जळगावचे व्यवस्थापकीय संचालक प्रमोद संचेती, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, प्रशाळेच्या संचालक डॉ.मधुलिका सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. बीबीएम व बीएमएसचे विद्यार्थी देखील यावेळी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा व खेळांचे आयोजन करण्यात आले. समन्वयक म्हणून डॉ.आर.आर.चव्हाण यांनी काम पाहिले.

**बातमी क्र. ५**

जळगाव दि.२८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने संत कबीर व्याख्यानमाले अंतर्गत गुरुवार दि.३० सप्टेंबर रोजी धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथे संत साहित्याचे अभ्यासक सचिन परब यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

श्री.परब हे संत कबीर व महाराष्ट्राची संत परंपरा या विषयावर व्याख्यान देणार आहेत. श्री.पी.ई.तात्या पाटील यांनी दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. या व्याख्यानमालेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ.विनोद पाटील व प्राचार्य डॉ. पी.आर.चौधरी यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी